<u>दिनांक: ०९/०४/२०२६</u>

<u>स.फौ.ख.क्र. ४९८/२०२५</u>
<u>शासन वि दिनेश</u>
<u>निशाणी क्रमांक: १२ लगत</u>

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **<u>माझे नांव</u>** | : | **धारेश्वर विक्रमसिंग राजपूत** |
| **<u>वय</u>** | : | **३७ वर्ष,** |
| **<u>व्यवसाय</u>** | : | **अंडापाव लॉरी** |
| **<u>राहणार</u>** | : | **गवळी वाडा ता.जि. नंदुरबार** |

..................................................................................................................

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर. ए. मोरे सरकारतर्फे</u> –**

**१.** पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते. पोलीसांनी माझ्यासमक्ष कारवाई पंचनामा केला नव्हता. पोलिसांनी माझ्या समक्ष काहीही जप्त केले नाही. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणतीही कारवाई केली नाही. आता मला कारवाई पंचनामा दाखविला असता त्यावरील सही माझी आहे. परंतु, कारवाई पंचनाम्यातील मजकूर मला माहिती नाही.

**<u>साक्षीदाराने पोलीसांना पुर्वी दिलेल्या बयानाप्रमाणे आज रोजी न्यायालयात साक्ष न दिल्यामुळे सहा. सरकारी वकीलांनी साक्षीदारास उलटतपासणीच्या स्वरूपात सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. करीता भा. सा. अधिनियमाच्या कलम १५४ नुसार परवानगी देण्यात आली.</u>**

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर. ए. मोरे सरकारतर्फे</u> –**

२. दि. २३/१०/२०२४ रोजी पोलीसांनी मला करजकुपा चौफुली, ता. जि. नंदुरबार येथे सार्वजनिक ठिकाणी कारवाई पंचनाम्याकामी बोलावले होते, हे म्हणणे खरे नाही. मी सही करणे अगोदर दस्त वाचतो. तेथे पोलिसांनी माझ्या समक्ष कारवाई पंचनामा तयार केला, हे म्हणणे खरे नाही. पोलिसांनी माझ्या समक्ष आरोपीच्या ताब्यातुन विदेशी दारु डी.एस.पी. ब्लॅक कंपनीच्या १८० मि.ली. च्या ६ बाटल्या, विदेशी दारु मॅकडोवेल नं. १ कंपनीच्या १८० मि.ली. च्या ६ बाटल्या, विदेशी दारु रॉयल स्टॅग कंपनीच्या १८० मि.ली. च्या ६ बाटल्या, विदेशी दारु ऑफीसर चॉईस ब्ल्यु कंपनीच्या

१८० मि.ली. च्या ६ बाटल्या, विदेशी दारु रॉयल ग्रीन कंपनीच्या १८० मि.ली. च्या ६ बाटल्या, किंगफिशर स्ट्रॉंग बियर कंपनीच्या ६५० मि.ली. च्या ६ बाटल्या, किंगफिशर स्ट्रॉंग बियर कंपनीचे ५०० मि.ली. चे ६ टिन, देशी दारु टॅंगो पंचच्या ९० मि.ली. च्या ३० बाटल्या, देशी दारु जनता संत्रा कंपनीच्या ९० मि.ली. च्या २० बाटल्या, असे सर्व जप्त केले, हे म्हणणे खरे नाही. तसेच, पोलीसांनी माझ्या समक्ष एक होंडा कंपनीची युनिकॉर्न मोटारसायकल क्र. जी.जे. १६ डी.एफ. २३७० जप्त केली, हे म्हणणे खरे नाही. जप्त मुददेमालातून प्रत्येकी एक बाटली सी. ए. तपासणी कामी नमुना बाजूला काढण्यात आली, हे म्हणणे खरे नाही. तसा पंचनामा पोलिसांनी माझ्यासमक्ष तयार केला, हे म्हणणे खरे नाही. त्यावेळी माझ्या सोबत दुसरे पंच योगेश साळुंखे हे होते, हे म्हणणे खरे नाही. मी घटनास्थळ पंचनामा वाचुन समजून त्यावर सही केली, हे म्हणणे खरे नाही. मी आरोपीला ओळखत नाही. मी आरोपीला ओळखत असल्याने मी त्याला वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

उलटतपास संपला.

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. पी. डी. बागुल यांचे मार्फत–**

उलटतपास नाकारला.

**फेरतपास नाही.**

नंदुरबार.
दि. ०९–०४–२०२६

| | |
|---|---|
| **माझ्या समक्ष** | **श्रवणोत्तर स्विकृत** |
| Sd/–xxx | Sd/–xxx |
| (राहुल भि. सुर्यवंशी) | (राहुल भि. सुर्यवंशी) |
| न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, | न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, |
| न्यायालय क्र. २, नंदुरबार | न्यायालय क्र. २, नंदुरबार |